
# पाळत कोणाची? कोणावर?

चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रस्तावना**

माहिती व संवादाच्या तंत्रज्ञानाची अलीकडची वर्धिष्णु प्रगती स्तिमित करणारी आहे. इंटरनेट, व्हीडिओ, मोबाईल फोन, स्मार्ट टीव्ही, वगैरे अनेक. त्यामुळे अनेक नवीन सामाजिक स्थित्यंतरे घडत आहेत. हे तंत्रज्ञान व नागरिकांची खासगी माहिती यांची रस्सीखेच चालू असते. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर ती वाढतच जाणार. समाज कसा असावा ही धारणा त्यामुळे परिवर्तनशील होते किंवा व्हायला हवी. हा मुद्दा महत्त्वाचा आहे कारण श्रेयस्कर सामाजिक बदलासाठी प्रयत्न करणाऱ्या चळवळी, राजकीय पक्ष यांच्या भूमिका तितक्या लवचिक दिसत नाहीत. त्यामुळे लोकमतही भूतकाळात अडकून रहाते आणि वर्तमानाशी सांधा जोडताना फरफट होते, भविष्यासाठी मानसिक तरतूद दूरच.

माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे त्यावरील नियंत्रण महत्त्वाचे ठरते. कारण त्यावर व्यक्तिगत आणि सामूहिक सीमा ठरतात. पुढचा प्रश्न लगेच येतो तो म्हणजे या सीमांचे उल्लंघन कोणत्या परिस्थितीत न्याय्य असते?



**पाळत, उद्दिष्टे व त्यातील बदल**

पाळत अनेक प्रकारची असू शकते. माझ्या क्रेडिट कार्डचा वापर बँकेच्या पाळतीवर असतो पण त्यामुळे माझ्या दैनंदिन व्यवहारावर निर्बंध येत नाहीत. पण पाळत जर एखाद्या समूहाला किंवा व्यक्तीला, समजा, विशिष्ट भू-मर्यादेत, परंपरेत अडकवून ठेवत असेल तर संचाराचे, आचाराचे, विचाराचे इ. स्वातंत्र्य मर्यादित होते. अशा प्रकारच्या पाळतीने समाजाच्या दुबळ्या स्तरावर जास्त अनिष्ट परिणाम होतो असे अभ्यासात आढळून आले आहे. परिघावरच्या समूहांना अधिकच आक्रसलेल्या अवकाशात वावरायला भाग पडते. ही पाळत सत्ता-आदर्शवाद या समीकरणातील बदलानुसार कमी-जास्त होऊ शकते. पाळत वाढण्याचे ताजे उदाहरण म्हणजे तालिबानची राजवट आल्यावर अफगाणिस्तानातील स्त्रियांचे स्थान अचानक बदलले. त्या 'अदृश्य'च होण्याची शक्यता आली आहे. पाळत कमी होण्याचे त्याच सुमाराचे ताजे उदाहरण म्हणजे मेक्सिको देशाने कोणत्याही प्रकारच्या गर्भपाताला सप्टेंबरमध्ये कायद्याने मंजुरी दिली. त्यामुळे स्त्रियांचे निवड-स्वातंत्र्य रातोरात वाढले.

पाळत कशासाठी या उद्दिष्टावर तिचे स्वरूप आणि कालावधी ठरतो. काही उद्दिष्टे पाहू. लोकांनी प्रथेप्रमाणे वागावे हे धार्मिक उद्दिष्ट व त्यासाठी पाळत. वय/स्त्री का पुरुष/निवासस्थान इत्यादी माहिती मिळवणे हे शासकीय उद्दिष्ट. एखाद्या अनियमित वर्तनाचा शोध लावण्यासाठी विशिष्ट व्यवहारावर/गटावर/भूभागावर पाळत. केवळ कुतूहल म्हणून एखाद्या समूहाची पाळत, इत्यादी अनेक उद्दिष्टांप्रमाणे पाळतीचे प्रकार. म्हणजे सरसकटपणे ती इष्ट का अनिष्ट हे सांगता येत नाही. या उद्दिष्टांची वेळोवेळी तपासणी आवश्यक असते. उद्दिष्टच जर कालबाह्य झाले असेल तर केवळ परंपरा म्हणून होणारी पाळत अप्रस्तुत ठरते. (महारवाडा, साळी आळी). त्यासाठी समाजाच्या नैतिकतेच्या ठेकेदारांना वारंवार आव्हान देणे आवश्यक असते. धर्मनिष्ठ राजवटीत हे अधिक कठीण असते. उदा. इराण, सौदी अरेबिया. पाळत ठेवणाऱ्या संस्थेची जनमानसातील विश्वासार्हता यात महत्त्वाची ठरते.

**पाळतीतील माहिती, सीमा, निषेध**

पाळत ठेवून मिळालेली माहिती कोण कशासाठी वापरणार हे माहीत असणे आवश्यक असते. प्रत्येक नागरिकाची कोविद तपासणी त्याचे स्वतःचे आरोग्य व संसर्गाची शक्यता यासाठी आवश्यक ठरते पण माहिती जर एखाद्याची मुस्कटदाबी करण्यासाठी वापरली जाणार असेल आणि जर ती व्यक्ती संभाव्य किंवा सिद्ध गुन्हेगार नसेल तर ती पाळत समर्थनीय ठरत नाही.

माहिती कशी गोळा केली जाते, ते महत्त्वाचे ठरते. ती बळजबरीने मिळवली जाते का ऐच्छिक असते का एखाद्या व्यक्तीवर पाळत आहे, हेच तिला माहीत नसते? माहितीची सुरक्षा कोण राखणार? उद्देश सफल झाल्यावर माहिती नष्ट केली जाणार का? (उदा. वैद्यकीय तपासणीचे निष्कर्ष). ही माहिती कोणाला मिळू शकते? कोणत्या अटींवर? माहिती काय प्रकारची आहे?

खासगी आणि सार्वजनिक माहिती मिळवण्यासाठी कोणते नियम असावेत हे त्या विरुद्ध ध्रुवांवर ठरते. माहिती मिळवायची का नाही; ती जाहीर करायची का दाबून ठेवायची, काही व्यक्ती किंवा समूह ती मिळण्यापासून वगळले जातात का?

त्याबरोबर माहिती गोपनीय का सार्वजनिक हे दोघांवरही अवलंबून असते - पाळत ठेवणारा व ज्याच्यावर पाळत ठेवली जाते, तो (या दोन बाजू) . पाळतीच्या उद्दिष्टाबद्दल दोघेही सहमत असतील तर सहकार्य होते (उदा. वर म्हटलेले कोविदचे सर्वेक्षण) अन्यथा नाही.

म्हणजे पाळत ही स्थिर संकल्पना नाही. तिचे स्वरूप तत्कालीन ध्येयधोरणाप्रमाणे बदलते. दोन्ही बाजूंच्या त्यावेळच्या नात्याच्या स्वरूपावर ती अवलंबून रहाते.

पाळत समजण्यासाठी सीमा ही मध्यवर्ती संकल्पना ठरते. माहितीचे स्वरूप, तिची दिशा, संबंधित व्यक्ती किंवा समूह, पाळत ठेवण्यासाठी उपलब्ध संधी व पैसे, इत्यादी गोष्टी ही सीमा ठरवतात. तसेच पाळत ठेवणारा कोणत्या भूमिकेत आहे - संरक्षक आहे का निर्बंधक आहे का सर्वेक्षक आहे, वगैरे.

पाळतीविरुद्ध निषेधाचे अनेक मार्ग अवलंबले जातात. पाळत ठेवून घेण्यास सरळ नकार देणे, टाळाटाळ, पाळत आहे हे ओळखणे, पाळतीखाली वेगळे वर्तन करणे, चुकीची माहिती देणे, उलट पाळत ठेवणे, इत्यादी. चाळीसएक वर्षांपूर्वी मलेशियातील शेतमजूर त्यांच्या कामाविरुद्ध कसा निषेध करत असत याचा अभ्यास झाला होता. ते मजुरी तर नाकारू शकत नसत कारण उदरनिर्वाहच बंद पडेल. मग सांगितलेले काम न ऐकल्यासारखे करणे, नेमलेल्या कामापेक्षा कमी काम करणे, पळवाटा काढणे, इत्यादी. पाळतीविरुद्ध अशाच क्लृप्त्या वापरल्या जातात.

**पाळत आणि मूल्ये**

या संदर्भात काही चिरंतन मूल्ये लक्षात घ्यायला हवीत. यातील काही परस्परविरोधी असतात. त्यांचे उत्तर हे किंवा ते असे प्रत्येक वेळी स्पष्ट देता येत नाही. कधीकधी 'दोन्ही' मूल्ये हवीत असे उत्तर येऊ शकते. मग पाळत कोणत्या संदर्भात, कोणत्या परिस्थितीत इष्ट वा अनिष्ट त्या संदर्भाचे स्पष्टीकरण आवश्यक ठरते. उदा. आपल्याला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि समूहाची सुरक्षितता दोन्ही महत्त्वाचे असतात. स्वातंत्र्यही हवे आणि शिस्तही हवी. त्यात हे किंवा ते असे द्वंद्व उभे करता येत नाही. 'ज्याला

लपवण्यासारखे काही नाही त्याला पाळतीची काय भीती?' हे अर्धसत्य आहे. (जरी व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुस्तकी व्याख्येनुसार म्हणजे मूलभूत हक्कानुसार पाळत हा व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे.) व्यक्तीची अपेक्षा आपल्याला न्याय्य, इतरांसारखे वागवावे अशी असते. पण या वागवण्यासाठी मुळात व्यक्ती कशी वागते हे माहीत असणे आवश्यक ठरते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यातील तणाव यावरून लक्षात यावा. परिणामतः स्थलकालानुसार व्यक्ती खासगी आयुष्य आणि बाहेरून मिळणारी वागणूक याला कमी-जास्त महत्त्व देते. शिवाय एका व्यक्तीचे मानसिक क्षितिज आणि सामूहिक मानसिक क्षितिज यात गुणात्मक फरक असतो. व्यक्तीच्या संकल्पना स्वाभाविकच मर्यादित असतात. सामूहिक संकल्पना समूहाच्या दृष्टीने बहुधा अधिक श्रेयस्कर असू शकतात. या दोन भूमिकांमध्ये परत तणाव असतो. तसेच 'खासगी' या मूल्याच्या आग्रहामागे गोपनीयतेचे कारण असू शकते पण गोपनीयतेने दुष्कृत्येही झाकली जातात. कृत्य सार्वजनिक झाल्यास ते करणाऱ्याचे उत्तरदायित्व वाढते. त्याच वेळी अतिसार्वजनिकतेने प्रयोगक्षमता, सर्जनशीलता, जोखीम घेणे, धाडसी वृत्ती यांवर मर्यादाही येतात. त्यात काही लोकांना अनामिकता हवी असते, काही लोकांना प्रसिद्धीचा हव्यास असतो. उदा. Big Boss - खासगी आयुष्य सार्वजनिक करणे - यात खासगी व सार्वजनिक यातील सीमा अस्पष्ट होतात. त्यातही, खोलात जाता, बऱ्याचजणांना आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या काही भागांसाठी अनामिकता तर काही भागांसाठी प्रसिद्धी हवी असते. काहीजणांना मुद्दाम कुप्रसिद्धी हवी असते, त्यांना पाळत पसंत असते. किंवा काहीजणांना येन केन प्रकारेण प्रसिद्धी हवी असते. ते हे तंत्रज्ञान उफराटे तरी करतात किंवा त्यावर छद्मी आरोप तरी करतात. उदा. जूही चावलाने 5G तंत्रज्ञानाच्या प्रसाराने पर्यावरणाची अतोनात हानी होईल असा दावा (अक्षरशः) केला. तो पब्लिसिटी स्टंट आहे असे कोर्टाचे मत पडले. तिला व तिच्याबरोबरच्या फिर्यादींना २० लाखाचा दंड झाला. (एकवेळ 5G ने पाळत वाढेल हा दावा समजू शकला असता!)

दुसऱ्या शब्दांत पाळतीकडे कोण कसा पाहतो हे व्यक्तिनिष्ठ रहाते, त्याचा लघुत्तम साधारण विभाजक काढता येत नाही.

**माहिती तंत्रज्ञान**

माहिती तंत्रज्ञानाकडे वळता त्याचे ते निष्पक्ष असते हे तितपतच बरोबर आहे जोपर्यंत ते 'खोक्या'त असते. समोर कोण आहे हे कॅमेऱ्याला माहीत नसते. फोटो काढणारा त्याच्या आवडीनुसार कोणाचा, कोठे, कसा फोटो काढायचा हे ठरवतो. तंत्रज्ञानापुढे सगळे समान असे म्हणणे म्हणजे गरीब आणि श्रीमंत दोघांनाही रस्त्यावर झोपायला परवानगी नाही, चोरी करायला परवानगी नाही असे म्हणण्यासारखे आहे. (Anatole France). तंत्रज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवण्याच्या समर्थनार्थ वर म्हटलेला सार्वजनिक उत्तरदायित्वाचा मुद्दा मांडला जातो. पण लोकांचे हेतू भिन्न असतात. मग तंत्रज्ञानाच्या मूळ उद्देशाऐवजी त्याचा आक्षेपार्ह वापर केला जातो. फोन, कॉम्प्युटरवरील passwords, कोणत्या वेब-साईट्स पाहिल्या, वगैरे अनेक खासगी गोष्टी कळू शकतात, hacking होते. whatsapp, gmail, facebook, skype ही प्रचलित लोकप्रिय माध्यमे वापरणाऱ्याविषयी माहिती गोळा करू शकतात, करतात. 'स्मार्ट' टीव्ही आपल्यावर नजर ठेवून असतो. ही माहिती telemarketing करणाऱ्या कंपन्या, spam पाठवणाऱ्या कंपन्या यांना मिळते आणि आपल्याला माहिती नसणाऱ्या व माहिती नको असणाऱ्या कंपन्यांच्या जाहिराती आपल्या कॉम्पुटरवर येतात, जरूर नसणाऱ्या वस्तूचे, सेवेचे विक्रेते फोनवर येतात, त्यामुळे या विस्तारावर टीका करणाऱ्यांच्या मते 'खासगी' असे आता काही राहिलेलेच नाही.

या संदर्भात आणखी एक मुद्दा मांडण्यासारखा आहे. सोशल मीडियावरील लोकांचा वाढता सहभाग हे लोकशाहीच्या वाढीचे निदर्शक आहे का तंत्रज्ञान पुरवणाऱ्या कंपनीची त्यांच्यावरच्या पाळतीत वाढ आहे का दोन्ही हे निश्चित सांगता येत नाही.

**Face-recognition**

दुकानात जाणारे, हॉटेलात जाणारे, सभेला जाणारे लोक तेथील Closed Circuit TV वर टिपले जातात. मग face-recognition नावाच्या प्रोग्रॅमने प्रत्येक माणसाचा चेहरा आयोजकांच्या ताब्यात रहातो. हे अल्बम लहान प्रमाणावर व तसे खासगी वापरासाठी असतात. मोठ्या प्रमाणावर चीनसारखा देश काय करतो ते पुढे पाहू.

पाळतीचा योग्य वापरही होऊ शकतो. लंडनमधील एका रेस्टॉरंटमध्ये गिऱ्हाईकांना खिसेकापूंचा सारखा त्रास होत असे. रेस्टॉरंटमधील CCTV चा उपयोग होईना. मग मालकाने प्रवेशापाशी face-recognition चा कॅमेरा बसवला व तशी नोटीस बाहेर लावली. बरेचसे उपद्रवी येण्याचे थांबले पण तरीही जे आले, त्यात त्याला ज्यांचा संशय येई त्यांच्या चेहेऱ्याचे फोटो अशा प्रचंड माहितीचा संग्रह असणाऱ्या कॉम्प्युटरकडे त्याने पाठवले. त्यातील ज्यांची biometric माहिती आधीच्या कोणत्यातरी गुन्ह्याबद्दल कॉम्पुटरमध्ये होती, ती जुळली व ते लोक सापडले. ही प्रक्रिया काही सेकंदात होते. मग त्याच्याकडे गोळा झालेल्या फोटोंचा संग्रह त्याने इतर दुकानदार, सुपरमार्केट, हॉटेल्स यांना पाठवला. त्या व्यवसायांनी या मंडळींचे फोटो त्यांच्या प्रवेशद्वारावर लावले व हे तंत्रज्ञान विकत घेतले. परिणामतः भुरट्या

चोरांच्या भेटी बंद झाल्या. रेस्टॉरंटच्या मालकाने हा नवीन व्यवसायच सुरू केला. Facewatch नावाची कंपनी स्थापन केली. कंपनीने ब्राझीलच्या पोलीस खात्याला हे तंत्रज्ञान विकले. त्यांना इंटरपोलला हवा असणारा एक गुन्हेगार या तंत्रज्ञानाच्या मदतीने सापडला, तसेच एक खुनी अनेक वर्षे फरारी होता, तो स्त्रीवेशात एका जत्रेत हिंडत होता, तोही सापडला.

पाळत वाढवण्याचा सरकारी अधिकृत दावा हाच असतो - गुन्हेगारांना पकडणे, संभाव्य गुन्हेगारांना ओळखणे. पण ती पाळत तिथपर्यंत राहील याची हमी नसते. अरुंधती रॉय म्हणतात त्याप्रमाणे, सरकारला आपली सगळी माहिती असते पण आपल्याला सरकारची काहीच माहिती नसते. यावर पुढील उपाय कदाचित तपासता येतील - राष्ट्र-राज्य ठेवत असलेल्या पाळतीची माहिती नागरिकाला द्यायला भाग पाडण्यासाठी कोर्टात जनहितयाचिका वारंवार दाखल करणे किंवा माहितीच्या अधिकाराखाली ती माहिती मिळवणे किंवा मुख्य प्रवाही व सोशल मीडियातून आवाज उठवणे.

बालमजुरीच्या विरोधात काम करणाऱ्या कैलाश सत्यार्थींना नुकताच नोबेल पुरस्कार मिळाला. त्यांचा मुलगा - भुवन रिभू - हेच कार्य पुढे चालवतो. भारतात हा प्रश्न फार मोठा आहे. मुले पळवली जातात, खाणींमध्ये, कारखान्यात, कुंटणखान्यात बालमजुरी करतात. रिभूच्या सांगण्याप्रमाणे गेल्या पाच-सहा वर्षांत सुमारे तीन लाख मुले गायब झाली आहेत आणि एक लाख कोणत्या ना कोणत्या तरी अनाथगृहात आहेत. यातील अनेकांचे आई-वडील त्यांच्या शोधात आहेत पण आजवरच्या लेखी पत्रव्यवहाराच्या तंत्राने त्यांचे एकत्रीकरण नजीकच्या भविष्यात शक्य नाही. अशा एका मुलाचा फोटो रिभूच्या संस्थेने भारतातील १७०० अनाथगृहांना पाठवला व तो मुलगा सापडला.

दिल्लीमध्ये हरवलेली मुले व सापडलेली मुले यांचे database तयार करण्यात आले आहेत.अशा वेळी face-recognition तंत्रज्ञान उपयोगी पडते. या दोन databases च्या छाननीने या एप्रिलपासून १० हजारहून अधिक मुले सापडण्याची शक्यता निर्माण झाली तर ८०० हून अधिक सापडली आहेत. Face-recognition ने रिभूचे काम सोपे होते, वेळ वाचतो.

आधार कार्ड हा या प्रकारचा जगातला सगळ्यात मोठा database आहे. तो पोलिसांना आजवर उपलब्ध नाही पण जर कधी झालाच, तर गैरवापराची शक्यताही वाढते. चीनने प्रत्येक नागरिकावर नजर ठेवण्याचे धोरण आखले आहे. विशेषतः त्यांच्या वीघर या मुस्लिम-बहुल प्रांतात सरकारला संभाव्य वाटणाऱ्या राजवटीच्या विरोधकांवर नजर ठेवण्यासाठी. एरवीही चीन (आणि आता हाँगकाँग) निषेध मोर्चांवर हे निरीक्षण करतो व अटका होतात. कोणतीही राजवट या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जॉर्ज ऑर्वेलच्या Big Brother सारखी पोलीसी राजवट होऊ शकते. त्याची चाहूल लागलीच आहे. ती पाहू.

**सत्तेसाठी पाळत**

सत्ता आणि ती टिकवण्याचे मार्ग हे कायमच विखारी मिश्रण असते. ते कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या काळापासून दिसते. आजवर सत्ता शाबूत राखण्यासाठी उघड किंवा गर्भित बळाचा वापर केला जाई. उदा. हिंसा करणे ही व्याख्येनेच राष्ट्र-राज्याची मक्तेदारी असते. ती अमान्य असणारे गट, हिंसाचाराकडे वळले किंवा वळत आहेत अशा संशय सरकारला आला तर ते अतिरेकी, देशद्रोही होतात (नक्षलवादी). राष्ट्र-राज्य त्यांचा 'न्याय्य' सामना हिंसेने करू शकते. तंत्रज्ञानाच्या विकासाने प्रत्येक वेळी असा बळाचा वापर आता करावा लागत नाही. वर म्हटल्याप्रमाणे सामान्य माणसाच्या रोजच्या वापरातील कॉम्पुटर, मोबाईल फोन यात सक्रिय सॉफ्टवेअर सुप्तपणे बसवणे शक्य झाले आहे. त्याबद्दल ती व्यक्ती अनभिज्ञ असते. या माहितीचा गैरवापर करून पोलीस, सरकार 'अडचणीच्या' व्यक्तींना त्रास देऊ शकतात. (भीमा-कोरेगावच्या आरोपींच्या कॉम्पुटरमध्ये काही आक्षेपार्ह फायली पोलिसांनीच घुसवल्या असे म्हटले जाते. त्या फायली ही सबब दाखवून अटकाही झाल्या.) माहिती तंत्रज्ञानावर आधारित पाळत कोठे जाणार? आज बहुतेक लोकशाही समाजांचा भविष्यकाळ शक्यतांचा दृष्टीने खुला आहे. समतेचे उदाहरण घ्यायचे झाले तर एखादा देश विविध प्रकारच्या समतेच्या कसोटीवर वर जाऊ शकतो किंवा खाली जाऊ शकतो. (साक्षरता, आयुर्मान, मिळकत, बालमृत्यू वगैरे कसोट्या.) पाळत ठेवणे हे धोरण या शक्यता नाकारते. देश एकाच दिशेने जावा हे ध्येय प्रत्येक नागरिकावर पाळत ठेवण्यामागे असते. त्यातील गुप्तता भयावह आहे कारण गुप्ततेने माहितीचा गैरवापर होऊ शकतो. उदा. एखादा गट मागासलेला आढळला तरी ही माहिती राजकीय सोयीसाठी जाहीर होत नाही व त्यावर इलाज केला जात नाही. विषमता रहातेच. म्हणून सरकारी पाळत असमर्थनीय आहे.

**Pegasus**

लेख लिहिण्याच्या वेळी जगभर गाजणारे प्रकरण म्हणजे Pegasus. NSO नावाच्या इस्रायली कंपनीने Pegasus हे सॉफ्टवेअर बनवले. NSO चे प्रमुख ग्राहक निरनिराळ्या देशांची सरकारे. (कंपनीचे काही भागभांडवल अमेरिका, ब्रिटन या देशांच्या सरकारी ताब्यातील नागरिकांचे निवृत्तीवेतनही आहे.) एमिरेट्स, सौदी अरेबिया, बहारीन, मोरोक्को या हुकूमशाही/घराणेशाही देशांनी आपल्या राजकीय विरोधकांवर नजर ठेवण्यासाठी हे सॉफ्टवेअर खरेदी केले. तसेच ब्राझील, हंगेरी, भारत या

लोकशाहींनी व इतर काही देशांनी. त्या सॉफ्टवेअरचा वापर करून अनेक व्यक्तींचे फोन त्यांच्या नकळत टॅप झाले. (जगात सुमारे ५० हजार). जगातील १७ प्रसारमाध्यमांच्या संघटनांनी या प्रकरणाचा शोध घेतला. त्यात Amnesty International, Washington Post, भारतातील The Wire इत्यादींचा समावेश होता. फ्रान्सचा राष्ट्राध्यक्ष (त्याचा फोन मोरोक्कोने टॅप केला असावा.), द. आफ्रिका देशाचा राष्ट्राध्यक्ष, पाकिस्तानचा इम्रान खान, मोरोक्कोचा राजा इ. १४ राष्ट्रप्रमुख त्यात आहेत. ३४ देशांतील राजकारणी आणि पत्रकार आहेत. भारतातील ज्यांचे फोन टॅप झाले, हे सिद्ध झाले, तो आकडा दीडशेच्या आसपास आहे, गुप्तपणे मिळवण्यात आलेल्या यादीनुसार खरा आकडा हजाराच्या वर आहे. त्यात CBI चे वरिष्ठ अधिकारी, उद्योगपती, मानवी हक्क कार्यकर्ते, पत्रकार, वगैरे. यातील बरेचसे लोक, त्यात विद्यमान नोकरशहाही आले, सध्याच्या सरकारला गैरसोयीचे असल्याने, भारत सरकारनेच हे spyware विकत घेतले असावे असा संशय निर्माण झाला त्यावर संसदेचे कामकाज थांबले पण सरकारने स्पष्टीकरण दिले नाही. माजी अर्थमंत्री चिदंबरम् यांच्या मते भारत हा जगातील एकच देश आहे जो हे प्रकरण गांभीर्याने घेत नाही. उदा. फ्रान्सच्या मॅक्रोनने इस्राएलच्या पंतप्रधानाबरोबर ही चर्चा लगेच केली. आपल्याकडे काही पत्रकारांनी सरकारवर दावा लावला आहे. आता (सप्टेंबर दुसरा आठवडा) प्रकरण सुप्रीम कोर्टात आहे. 'राष्ट्रीय सुरक्षेच्या गोष्टी सार्वजनिक करता येत नाहीत' असे सरकारी प्रतिपादन आहे. तो रोख कळावा.

या छुप्या पाळतीने कोण, कोणाशी, कोठे, केव्हा, काय बोलला याची नोंद झाली. त्यात NSO ने हात झटकले. 'आम्ही आतंकवादी, गुन्हेगार यांच्यावर पाळत ठेवणाऱ्या सच्च्या देशांनाच हे सॉफ्टवेअर विकतो.' त्यांच्या या निर्यातीवर बंदी घालायला इस्राएलचे सरकार तयार नाही.

हे spyware तेथे आहे हे कळण्यासाठी Amnesty International ने प्रयोगशाळेत जे मिळाले ते फोन तपासले. remote control ने spyware फोनमध्ये बसवले जाते. ते तेथे आहे असे उघडकीला आल्यास ते आपलेआप नष्ट होईल अशीही 'सोय' होती. तसे प्रत्येक वेळी न झाल्याने हा शोध लागला.

एक भयानक उदाहरण म्हणजे, २०१८ ला जमाल खाशोगी या सौदी अरेबिअन पत्रकाराचा खून झाला. खाशोगी राजवटीविरुद्ध होता व अमेरिकेत असे. तो तुर्कस्तानमध्ये सौदी दूतावासात गेला असताना सौदी अरेबियाच्या राजपुत्राने हस्तकांमार्फत त्याचा खून करवला. तेव्हा बराच गहजब झाला. खाशोगीवर सतत पाळत ठेवण्यासाठी Pegasus चा उपयोग झाला असे अहमद मन्सूर या सौदी राजवटविरोधी दुसऱ्या पत्रकाराचा दावा. तो स्वतःही या सॉफ्टवेअरचा बळी होणार होता, वाचला. राजवटी अशा तंत्रज्ञानाने काय थराला जाऊ शकतात हे यावरून दिसते.

**या विषयातील अभ्यासकांची काही मते**

- वैयक्तिक माहिती जर व्यक्तीची संमती न घेता घेतली जात असेल आणि ती वैयक्तिक, सामाजिक, वेळाची किंवा अवकाशाची सीमा उल्लंघत असेल तर त्या व्यक्तीला अशी माहिती गोळा करणे चूक वाटते.

- पाळतीचा विस्तार तंत्रज्ञानाने वाढत आहे. त्यात माहितीच्या अभ्यासाने दाखवलेला निष्कर्ष दुय्यम ठरतो आणि माहितीलाच जास्त महत्त्व मिळते.

- पाळत ठेवणाऱ्याकडून व्यक्तीची काय अपेक्षा आहे, ती अपेक्षा काही प्रमाणात पुरवल्यास पाळत सह्य होऊ शकते.

- आजवरच्या उद्दिष्टांसाठी नव्या प्रकारे पाळत ठेवणे हे लोकांना एकवेळ मान्य होऊ शकेल पण नवी उद्दिष्टे व त्यांच्यासाठी नवी पाळत हे पचनी पडणे कठीण आहे.

- पाळत ठेवण्याच्या उघड साधनांवर जशी जास्त बंधने येतात (लोकमताने, कायद्याने), तसा छुप्या साधनांचा वापर वाढतो.

- DNA तपासणी, चेहरा ओळखणे, चालण्याची पद्धत ओळखणे अशा पाळत ठेवण्याच्या प्रगत तंत्रज्ञानांनी प्रचंड माहिती गोळा होते. त्यातून एका विशिष्ट व्यक्तीचे नाव, स्थान कळू शकते पण सुक्याबरोबर ओलेही जळू शकते.

**निरीक्षण**

पहिला मुद्दा तंत्रज्ञान. ते, त्याचे ते, आपल्यावर पाळत ठेवत असते आणि त्यावर निर्बंध नसतात किंवा आले तर उशीरा येतात. तोपर्यंत तंत्रज्ञान पुढे सरकलेले असते. तंत्रज्ञानाला देशाच्या सीमा लागू नसल्याने त्याचा वापर देशविरोधी शक्ती, बेकायदेशीर उद्योग करतात. उदा. Pegasus चा वापर मेक्सिकोतील ड्रग्सच्या व्यापारातही झाला. त्यावर सरकारचेच नियंत्रण नव्हते, तर सामान्य माणूस काय करणार?

दुसरा मुद्दा सरकार. तो व्यामिश्र आहे. सरकारवरचा विश्वास किंवा अविश्वास देशव्यापी पाळत चांगली का वाईट ठरवतो. पण त्या मताने पाळतीपासून सुटका होत नाही. सरकारला माहिती मिळाल्यावर पुढचा प्रश्न येतो. ही माहिती ज्या उद्दिष्टासाठी गोळा केली आहे असे लोकांना पाळतीच्या आधी सांगितले गेले, त्या उद्देशापुरता तिचा वापर मर्यादित राहील याची खात्री नसते. सरकारचे काही अघोषित उद्देश असू शकतात. सरकार माहितीचा वापर त्या उद्देशांसाठी करते का यावर लोकांची सतर्क नजर हवी. म्हणजे परत तंत्रज्ञानाची जरूरी. मेख इथे आहे. Amnesty सारख्या संस्थेकडे यासाठी असणारे आर्थिक, तांत्रिक आणि नैतिक बळ असणाऱ्या किती संघटना भारतात आहेत?

सध्याचे सुप्रीम कोर्ट अशा प्रकरणांबाबत जागरूक दिसते. संस्था म्हणून लोकशाहीला तो आधार आहे. पण सरन्यायाधीश बदलला की त्याचे धोरणही सरकारला अनुकूल होऊ शकते असा इतिहास आहे.

एखाद्या संस्थेतील गोपनीय माहिती अनधिकृतरीत्या (बहुधा जनहितासाठी) जाहीर करणाऱ्याला whistleblower म्हणतात. सरकारी माहितीचे wikileaks ने, Snowden ने केले तसे अपहरण हा तिसरा पर्याय रहातो. असे whistleblowers समाजाला आवश्यक असतात. त्यांचा वैयक्तिक बळी व्यवस्था घेणार पण तेवढ्यापुरता तरी सरकारला चाप बसतो.

**निष्कर्ष**

पाळतीच्या संदर्भात तंत्रज्ञानाची सतत तपासणी हा सरकारवरच्या देखरेखीपेक्षा गंभीर प्रश्न आहे. तो अंतहीन प्रयास आहे. लेखाच्या सुरुवातीला चळवळी, राजकीय पक्ष, लोकमत ही समाजपरिवर्तनाची आजवरची जनाधारित रणनीती कालबाह्य होत आहे असा उल्लेख केला. त्यांची क्षीण परिणामकारकता एरवीही दिसत आहे. (उत्तरेतील शेतकरी आंदोलन.) त्यात पाळतीविरुद्ध मोर्चे निघतील असे वाटत नाही.

आजची गरज उच्चतंत्रज्ञांची आहे. समाजासाठी धोकादायक तंत्रज्ञान त्यांनी निष्प्रभ करावे ही अपेक्षा. या प्रक्रियेची सुरुवात भारतात व्हायला हवी.

*चन्द्रशेखर पुरन्दरे, इंग्लंड*
*http://www.purandarearts.com*
*http://www.art-non-deco.com*
*art-non-deco@yahoo.co.uk*

❐